**नागरिकांनी तंबाखूजन्य पदार्थापासून दूर रहावे : जिल्हाधिकारी सचिन्द्र प्रताप सिंह**



दि. १८: कर्करोगांमध्ये निम्म्या पेक्षा जास्त कर्करोग हे तंबाखूजन्य पदार्थ सेवन केल्याने होतात. तंबाखू सेवन हे ब-याच आजाराचे प्रमुख कारण आहे. त्यामुळे तंबाखूजन्य पदार्थापासून दूर रहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी सचिन्द्र प्रताप सिंह यांनी जिल्हयातील नागरिकांना केले.

तंबाखूचं सेवन हे फक्त कर्करोगालाच आमंत्रण देत नाही तर, दुसरे आजारही तंबाखूमुळे होऊ शकतात. त्यामुळे समाजातील नागरिकांनी, विद्यार्थ्यांनी तंबाखूसेवनाच्या दुष्परिणामाबद्दल जनजागृती करावी. तंबाखू सेवनाने फ्फुफुस, अन्न नलिका, किडनी, आतड्या, यकृत या सारख्या मुख्य अवयवांवर वाईट परिणाम होणारे रोग उद्धवतात. या पदार्थांचे धोके लक्षात घेऊन सर्वांनीच त्यापासून दूर राहवे.

नागरिकांनी मनावर ताबा ठेवून तंबाखू सेवन बंद करावे, हाच यावरील सर्वोत्तम उपाय ठरू शकतो. ग्रामीण व शहरी भागात गुटखा, तंबाखू यांचे प्रमाण अधिक आहे. विशेषतः शहरी भागामध्ये धूम्रपानाचे प्रमाण वाढत आहे. तबांखूजन्य पदार्थाच्या सेवनामुळे नागरिकांच्या आरोग्याला मोठा धोका निर्माण झाला आहे. यामुळे भविष्यात हृदयविकार, मानसिक त्रास व अन्य त्रास होण्याची शक्यता आहे.

तंबाखूजन्य पदार्थांच्य सेवनामुळे तोंड, स्वरयंत्र, फुफ्फुस, गळा, अन्ननलिका, मूत्राशय, मूत्रपिंड, नाक, गर्भाशयाचा कर्करोग असे विविध आजार होण्याचे शक्यता असते. तंबाखूत असणाऱ्या निकोटीनमुळे मेंदूचे कार्य मंदावत असून विचार करण्याची क्षमता कमी होते. त्यामुळे भविष्यात होणा-या विविध आजारापासून दूर राहण्यासाठी नागरिकांनी तंबाखूजन्य पदार्थांचे सेवनापासून दूर रहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी सचिन्द्र प्रताप सिह यांनी नागरिकांनी केले आहे.

................................